जा.क्रं.माध्य.(३)ज्या.तु./पु.वि./८०
शिक्षण उपसंचालक पुणें विभाग पुणें-१
दिनांक - /७/१९८०

महत्त्वाचे

प्रति,

शाळा प्रमुख,
श्री. शिवाजी विद्यालय
देहूरोड (पुणे)

विषय :- सन १९८०-८१ साठी मंजूर तुकडयांच्या संबंधी.

संदर्भ :- १) आपले पत्र क्रं. ----------------
२) शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद पुणें यांचे पत्र क्रं.

महोदय,

आपल्यावरील संदर्भांकित पत्रानुसार आपणांस कळविण्यात येत आहे कीं, आपल्या शाळे साठी सन ८०-८१ साठी खालीलप्रमाणे वर्गवार तुकडया अंतिमस्वरूपात मंजूर करण्यांत येत आहेत. तरी मंजूर तुकडयाचे प्रमाणांत आपल्या जिल्याच्या शिक्षणाधिकारी यांचेकडून नियमानुसार शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी मंजूर करुन द्यावेत. मंजूर तुकडयांचे व्यतिरिक्त ज्यादा तुकडया कोणत्याही परिस्थितीत चालू ठेवू नयेत. - मंजूर नसलेल्या तुकडयांचे संबंधातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पगारास तसेंच नामंजूर तुकडयांतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस कोणत्याही प्रकारे शासन जबाबदार राहणार नाही. त्याचप्रमाणे मान्यता नसलेल्या वर्ग / तुकडया सुरु ठेवल्यास नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही करण्यांत येईल.

| अ.क्रं. | इयत्ता | ५वी | ६वी | ७वी | ८वी | ९वी | १०वी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | मागील वर्षाच्या तुकडया | 2 | 2 | 2 | 4 | 3 | 2 | 15 |
| २) | या वर्षाच्या मान्य तुकडया | 2 | 2 | 2 | 4 | 3 | 2 | 15 |
| ३) | कमी – जास्त + | | | | | | | |

जादा होणाऱ्या कर्मचाऱ्यांत नियमानुसार सेवा समाप्तीची नोटीस त्वरित देण्यात यावी.

यांची स्वाक्षरी आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणें विभाग, पुणें.

प्रत- शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद पुणें संबंधित शाळेस वरील मंजूर तुकडयांच्या अनुषंगानेच नियमानुसार कर्मचारी त्वरीत मंजूर करण्यात यावेत.

प्रत - अधिक्षक, वेतन पथक पुणें.